झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा./सप्रा-१/झोपुआ/१३७८/२०२५
दिनांक : ०२/०७ /२०२५

# झोपडपट्टी पुनर्वसन आदेश
## ( झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना )

प्रस्तावना -

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

(२) ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद स.नं.१३३, फा. प्लॉट नं.५८५, दांडेकर पुल, पर्वती, पुणे झोपडपट्टी क्षेत्रावर अंदाजे क्षेत्रफळ १६३८९.७६ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर मिळकत असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी सदर क्षेत्रातील झोपडीधारकांनी ७०% संमती देऊन नियुक्त केलेले विकसक मे.नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे; आणि सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे आवश्यक असल्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे यांची खात्री पटली आहे; आणि

(३) ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र हे पुणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये पुर्णत: समाविष्ट करणेत आले आहे; आणि

(४) ज्याअर्थी, तत्कालीन सक्षम प्राधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी सदरची मिळकत महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२२/१२/१९८३, पान क्र.३४३० वर प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार १६३८९.७६ चौ.मी.एवढे / इतके क्षेत्र झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. सदर मिळकतीमधील झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी दि.०३/०५/२०११ रोजी प्रसिध्द करणेत आलेली असून अंतिम पात्रता यादीनुसार ६०५ झोपडीधारकांचा योजनेमध्ये समावेश आहे. तसेच, सदर मिळकत ही खाजगी मालकीची म्हणजेच विकसक मे.नाईकनवरे डेव्हलपर्स यांचे मालकीची आहे. आणि;

(५) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमधील क्षेत्र खाजगी मालकीचे असून या क्षेत्राचे मालकी हक्क / विकसन हक्क झोपडीधारकांनी ७०% संमती देऊन नेमलेल्या विकसकाने प्राप्त केले आहेत. आणि;

(६) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीची आद्यावत शासकीय मोजणी नकाशा सादर झालेनंतर त्यानुसार येणारे योजनेचे क्षेत्र व चतु:सिमा अंतिम राहतील. आणि;

(७) ज्याअर्थी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे यांनी यापूर्वी दि.२४/१२/२००७ रोजी कलम ३क नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित केले होते, मात्र ते राजपत्रात प्रसिध्द होऊ न शकल्याने विधीवत कार्यवाही होणेसाठी पुन्हा आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी नीलेश गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले हे क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे. आणि

आदेश :-

१. खालील अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम,१९७१ मधील कलम ३(क) नुसार "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

२. अनुसूचीमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना / हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरुपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषीत करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव :** स.नं.१३३, फा. प्लॉट नं.५८५, दांडेकर पुल, पर्वती, पुणे

**महानगर पालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका**

| पेठ | स.नं. | जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) अंशत: / पूर्णत: | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| दांडेकर पुल, पर्वती, पुणे | स.नं.१३३, फा. प्लॉट नं.५८५ | खाजगी मिळकत | १६३८९.७६ चौ.मी. | **पुर्वेस** - लागु फा.प्लॉट क्र.५८७<br>**दक्षिणेस** - लागू रस्ता, (सिंहगड रस्ता)<br>**पश्चिमेस** - लागु रस्ता (दांडेकर पुल)<br>**उत्तरेस** - लागु नाला (अंबिल ओढा) | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- ०२/०७/२०२५

(नीलेश गटणे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत -

१. मा. जिल्हाधिकारी, पुणे
२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
३. व्यवस्थापक, मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
   वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात ही विनंती
४. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे - झोपडपट्टी पुनर्वसन पुर्वसूचना आदेश या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.
५. विकसक मे.नाईकनवरे डेव्हलपर्स, प्रा.लि